# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२१ ऑक्टोबंर,२०२०

☎ : 07172-264300

: 07172-255800

✍: 7276494810 (PRO)


# चंद्रपुर जिल्हा पोलीस मुख्यालयात "शहिद स्मृतीदिनी" शहीद पोलीसांना श्रध्दांजली

२१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाख भागात हॉट स्प्रिंग येथुन सहा मैल पुर्वेला केंद्रीय राखीव पोलीस दलाची तुकडी कडाक्याच्या थंडीमध्ये नेहमीप्रमाणे भारत तिबेट सिमेवर टेहळणी करीत होती. त्यांच्यावर चिनी सैनिकांनी अचानक अत्याधुनिक शस्त्रामधुन गोळ्यांचा वर्षाव सुरू केला. तेव्हा १९ जणांच्या पोलीस दलाच्या या तुकडीने आपले प्राण पणाशी लावुन त्यांचा प्रतिकार केला. त्यापैकी १० जवानांनी देशासाठी आपले प्राण अर्पण केले. आपल्या देशातील पोलीसांनी देशासाठी केलेल्या बलीदानास व शहीदांच्या स्मृतींना श्रध्दांजली अर्पण करण्याकरीता दिनांक २१ ऑक्टोंबर हा दिवस पोलीस शहिद स्मृतीदिन म्हणुन पाळण्यात येतो.

दिनांक २१ ऑक्टोंबर २०२० रोजी सकाळी ०८.३० वाजता पोलीस मुख्यालय, चंद्रपुर येथील हुतात्मा स्मारक येथे भारत देशातील पोलीस अधिकारी व कर्मचारी ज्यांनी आपले कर्तव्य बजावित असतांना देशासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. अशा शहींदाचे नावाचे वाचन करून त्यांना सलामी गार्ड व बॅन्ड पथकासह शोक सलामी अर्पीत करण्यात येवुन बंदुकीच्या फैरी हवेत झाडुन श्रध्दांजली देण्यात आली. या श्रध्दांजली कार्यक्रमाकरीता जिल्हाधिकारी चंद्रपुर श्री. अजय गुल्हाने, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. चंद्रपुर श्री. राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. अरविंद साळवे यांची उपस्थिती होती. तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत खैरे, व जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस स्टेशन व शाखा प्रभारी अधिकारी, व कर्मचारी उपस्थित होते. श्रध्दांजली कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांनी, शहीद परिवारातील सदस्यांनी आणि सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी पोलीस दलातील हुतात्मा यांना पुष्पचक्र अर्पण करून श्रध्दांजली दिली.

शहीद जवानांच्या नावाचे वाचन पो.उप.नि. श्री. विकास मुंढे व श्री. सचिन गदादे यांनी केले.

---